पाच पिढ्यांच्या विश्वासाची अखंड परंपरा
माणक ज्वेलर्स
फूलचंद माणकलाल अँण्ड कं.
१९०७, एम.जी.रोड.
चोपडा, जि. जळगाव
पिन-४२५१०७ ९३७०५८१५५३

सुविचार - जीवनाची सौंदर्य त्याच्या विविधतेत आहे. प्रत्येक अनुभव, चांगला किंवा वाईट, तुमच्या जीवनाला समृद्ध करतो.

महाराष्ट्राचे निडर दैनिक
# शौर्य मराठी
RNI-MAHMAR/2023/89125

| | | |
|---|---|---|
| सेन्सेक्स | ७४,६४९.८४ | +३८२.५० +०.५२% |
| डॉलर | ₹ ९५.३७ | |

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३९ | २७ |
| दिल्ली | ७० | २८ |
| मुंबई | ३६ | २८ |
| नागपूर | ३९ | २८ |
| पुणे | ३६ | २४ |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | बुधवार, दि. ३ जून २०२६ | वर्ष २ रे | अंक २०२ किंमत : ५ रु. | पाने ४

सूर्योदय - सूर्यास्त
स.-५:४६ संध्या-७:०६

सोने - चांदी
सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,५४,०००/- २,५५,०००/-
Rate By : माणक ज्वेलर्स, चोपडा

# केरळमध्ये उद्या मान्सून धडकणार


## हवामान विभागाचा अंदाज; पुढील सहा ते सात दिवसात केरळमधील विविध भागात मुसळधार पाऊस

वृत्तसंस्था । मुंबई

**सर्व देशाचे लक्ष केरळमध्ये मान्सून केव्हा दाखल होतो याकडे लागले आहे. दरम्यान, मान्सूनच्या केरळमधील आगमनाविषयी भारतीय हवामानशास्त्र विभागाने नवी तारीख मंगळवारी जाहीर केली. याआधी हवामान विभागाने २६ मेच्या आसपास मान्सून केरळमध्ये दाखल होईल, असा अंदाज वर्तवला होता. मात्र, हवामान विभागाच्या अंदाजानुसार मान्सून केरळमध्ये दाखल झाला नाही. सध्या मान्सूनच्या पुढील वाटचालीसाठी परिस्थिती अनुकूल आहे, त्यामुळे मान्सून गुरुवार दि.४ जून रोजी केरळात दाखल होईल,अशीही माहिती हवामान विभागाने दिली आहे.**

मान्सूनचे आगमन लांबल्याने उष्णतेचा सामना करणाऱ्या नागरिकांच्या समस्यांमध्ये वाढ झाली आहे. राज्यात अनेक भागात पूर्व मान्सून सक्रिय झाला असला तरीही काही भागात उकाडा कायम आहे. तसेच

**हवामान विभागाच्या अंदाजानुसार, गुरुवार, ४ जून रोजी केरळ येथे मान्सूनचे आगमन होण्याची शक्यता आहे. यामुळे लवकरच मान्सूनच्या पुढील वाटचालींना वेग येईल, असा अंदाज वर्तवण्यात येत आहे. तसेच पुढील ६ ते ७ दिवसात केरळमधील विविध भागात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. तसेच तामिळनाडू, कर्नाटक येथील काही भागात मुसळधार पावसाचा अंदाजही व्यक्त करण्यात आला आहे.**



काही भागात कमाल तापमानात काहीशी घट झाली असली तरीही उन्हाचा त्रास नागरिकांना सहन करावा लागत आहे. वादळी पावसामुळे केवळ काही काळ नागरिकांना गारवा अनुभवयाला मिळत आहे. यात केरळमध्ये मान्सूनचे आगमन काहीसे लांबले आहे. दरम्यान, हवामान विभागाने केरळ येथे मान्सून दाखल होण्याची नवी तारीख मंगळवारी जाहीर केली.

हवामान विभगाने व्यक्त केलेल्या शक्यतेनुसार, ४ जूनच्या आसपास नैऋत्य मोसमी वाऱ्यांची वाटचाल आग्नेय अरबी समुद्रातील काही भाग, लक्ष्यद्वीप समूह, केरळ आणि तामिळनाडूमधील काही भाग, तसेच बंगालच्या उपसागरात होण्यासाठी अनुकूल स्थिती आहे. यामुळे पुढील काही दिवसात या सर्व प्रदेशात मान्सूनचा प्रभाव वाढण्याची शक्यता आहे. मान्सून गुरुवारी केरळमध्ये दाखल झाल्यास आणि अनुकूल स्थिती असल्यास लवकरच मान्सून महाराष्ट्राच्या दक्षिण किनारपट्टीवर दाखल होण्याचा अंदाज आहे. दरम्यान, राज्यातील मध्य महाराष्ट्र, (पान २ वर)

## पश्चात्ताप झाला असेल तर मातोश्रीवर या : संजय राऊत यांचं आवाहन

वृत्तसंस्था । मुंबई



**विधान परिषदेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात राजकीय घडामोडींना प्रचंड वेग आला आहे. विशेष म्हणजे या निवडणुकीच्या निमित्ताने महायुतीमधील धुसफूस समोर आली आहे.**

महायुतीत अनेक ठिकाणी बंडखोरी झाली आहे. छत्रपती संभाजीनगर-जालना विधान परिषदेच्या जागेवरुन तर राजकारण चांगलंच तापलं आहे. महायुतीत ही जागा अखेर भाजपला सुटली. भाजपकडून सुहास शिरसाट यांना उमेदवारी देण्यात आली. पण उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे ज्येष्ठ नेते अब्दुल सत्तार यांचे पुत्र समीर सत्तार यांनी इथे उमेदवारी अर्ज दाखल केला. यानंतर अब्दुल सत्तार यांनी भाजपवर सडकून टीका केली आहे.

भाजप हे स्लो पॉईजन आहे. हळूहळू शिवसेनेला संपवत आहे, असं अब्दुल सत्तार म्हणाले. अब्दुल (पान २ वर)

### संजय राऊत नेमकं काय म्हणाले?

शिवसेना एकच आहे. मी कालही म्हणालो. दोन शिवसेना असूच शकत नाही. जिथे ठाकरे तिथे शिवसेना. शिवसेनेचं काम हे नेहमी शिवसेना भवन किंवा मातोश्री येथून चालतं. ठाकरे नाहीत तर ती शिवसेना कशी असणार?, असा सवाल संजय राऊत यांनी केला आहे.

## थोडक्यात



### हात-पाय तोडले तरच कायद्याचा धाक बसेल

**बेंगळुरू ।** गुन्हेगारांचे हात-पाय तोडले, तरच कदाचित लोकांना कायद्याचे पालन कसे करावे हे समजेल. आपल्या देशात लोकशाही असल्याने प्रत्येक जण कायद्याला गृहीत धरत आहे,फ्र अशी टिप्पणी कर्नाटक उच्च न्यायालयाने केली आहे. एका अभियांत्रिकी विद्यार्थ्याच्या जामीन अर्जावरील सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती आर. नटराज यांनी ही तोंडी निरीक्षणे नोंदवली.न्यायमूर्ती आर. नटराज यांनी पुढे बोलताना स्पष्ट केले की, सध्या गुन्हेगार अतिशय ङ्गसहजतेनेफ आणि उजळ माथ्याने गुन्हे करत आहेत, कारण त्यांना कायद्याचा किंवा शिक्षेचा कोणताही धाक उरलेला नाही. गुन्हेगारांना जरब बसेल अशी अद्दल घडवली जात नाही, याकडे त्यांनी लक्ष वेधले.



### वैभव सूर्यवंशी टीम इंडियात पदार्पणासाठी सज्ज

**मुंबई ।** १५ वर्षांच्या वैभव सूर्यवंशीने आयपीएल २०२६ मध्ये धुमाकूळ घातला. भारतीय क्रिकेटमध्ये अवघ्या १५ वर्षांच्या वयात अशी वादळी कामगिरी करणारा खेळाडू क्वचितच पाहायला मिळाला असेल. आयपीएल २०२६ मध्ये आपल्या वादळी फलंदाजीने अनेक विक्रमांना गवसणी घालणाऱ्या वैभव सूर्यवंशीकडे बीसीसीआयचे आता पूर्ण लक्ष लागलं आहे. त्याच्या कामगिरीने केवळ क्रिकेट चाहत्यांनाच चकित केले नाही, तर बीसीसीआयच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनाही प्रभावित केलं आहे. यामुळेच निवड समितीवर आता वैभवबाबत एक मोठा निर्णय घेण्याचा दबाव वाढत आहे.

## क्रिकेटची खेळपट्टी तयार करताना १५ वर्षांच्या मुलाचा रोलरखाली मृत्यू

### २ प्रशिक्षकांवर गुन्हा दाखल

वृत्तसंस्था । सोलापूर

**सोलापूर जिल्ह्यातून एक अत्यंत धक्कादायक आणि मन सुन्न करणारी घटना समोर आली आहे.**

बार्शी येथे आयोजित एका उन्हाळी क्रिकेट प्रशिक्षण शिबिरामध्ये खेळपट्टी तयार करताना जड रोलरखाली चिरडून एका १५ वर्षांच्या मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाला. ३० मे रोजी सकाळी ही घटना घडली. याप्रकरणी निष्काळजीपणाचा ठपका ठेवत पोलिसांनी दोन क्रिकेट प्रशिक्षक आणि संबंधित क्रिकेट असोसिएशनवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला आहे. या घटनेमुळे क्रीडा जगतात आणि पालकांमध्ये प्रचंड संताप आणि हळहळ व्यक्त होत आहे.

३० मे रोजी सकाळी सरावाचे सत्र सुरू होण्यापूर्वी खेळपट्टी तयार करण्याचे काम सुरू होते. नेहमीप्रमाणे मैदानावर खेळपट्टी सपाट करण्यासाठी जड रोलर फिरवला (पान २ वर)

## म्यानमारमध्ये स्फोटकांच्या गोदामात भीषण स्फोट

### ४५ जणांचा मृत्यू

वृत्तसंस्था । नायप्यीडॉ

**म्यानमारच्या इशान्येकडील भागात एका स्फोटकांच्या गोदामामध्ये रविवारी झालेल्या भीषण स्फोटात किमान ४५ जणांचा मृत्यू झाला आहे. खाण उद्योगासाठी वापरण्यात येणारी स्फोटके या गोदामामध्ये साठवून ठेवण्यात आली होती, असे बचाव पथकाने आणि म्यानमारमधील तटस्थ माध्यमांनी म्हटले आहे.**



या स्फोटामध्ये किमान अन्य ७० जण जखमी झाले आहेत. नामकाम शहरातल्या कौंगतप गावामध्ये रविवारी दुपारच्या सुमारास हा स्फोट झाला. हा भाग म्यानमारला लागून असलेल्या चीनच्या सीमेच्या ३ किलोमीटर दक्षिणेला आहे.

स्फोटाची माहिती मिळताच मदत आणि बचाव पथके घटनास्थळी रवाना झाली आहेत.

स्फोटात मरण पावणाऱ्यांची संख्या ५० ते ५५ इतकी असावी, असा अंदाज शान प्रांतातील सरकारी वृत्तसंस्थेबरोबर अन्य काही वृत्तसंस्थांनी वर्तवला आहे. मृतांचा आकडा खूप जास्त असावा, असा अंदाज चिनी वृत्तसंस्थेनेही वर्तवला असून अनेक घरांची पडझड झाल्याचेही चिनी वृत्तसंस्थेने म्हटले आहे.

## उत्तर महाराष्ट्र, मराठवाड्यातील काही भागांत पुढील २४ तासात वादळी पावसाची शक्यता

वृत्तसंस्था । पुणे

**राज्यात गेल्या काही दिवसांपासून हवामानात सातत्याने बदल होत असून, अनेक भागांमध्ये मान्सूनपूर्व पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. याच पार्श्वभूमीवर भारतीय हवामान विभागाने राज्यातील विविध जिल्ह्यांसाठी महत्त्वाचा इशारा जारी केला आहे.**



यामध्ये मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र तसेच छत्रपती संभाजीनगर विभागातील काही भागांमध्ये वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस आणि गारपिटीची शक्यता वर्तविण्यात आली आहे. त्यामुळे पुढील २४ तास नागरिकांनी विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. हवामान विभागाने काही जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट जारी केला असून, विजांच्या कडकडाटासह ताशी ३० ते ४० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता व्यक्त केली आहे. राज्यातील अनेक भागांत उष्णतेचा प्रभाव काहीसा कमी झाला असला तरी अवकाळी पावसामुळे शेतकरी आणि नागरिकांची चिंता वाढली आहे. हवामान तज्ज्ञांच्या मते, नैऋत्य मान्सून राज्याच्या दिशेने वेगाने सरकत असून, त्याच्या आगमनापूर्वी अशा स्वरूपाचे मान्सूनपूर्व पावसाचे वातावरण कायम राहण्याची शक्यता आहे.

### नागरिकांना सतर्कतेचे आवाहन

**हवामान विभागाने नागरिकांना वादळी वारे, विजांचा कडकडाट आणि गारपिटीच्या शक्यतेमुळे आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे. शेतकऱ्यांनी पिके, जनावरे आणि शेती साहित्य सुरक्षित ठिकाणी ठेवावे, तर नागरिकांनी खराब हवामानाच्या काळात अनावश्यक बाहेर पडणे टाळावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.**

### तापमानात चढ-उतार

जळगाव ४१.५ परभणी, धाराशिव आणि धुळे येथे ४१ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली होती. मात्र गेल्या काही दिवसांतील पावसामुळे राज्यातील अनेक भागांमध्ये तापमानात घट झाली आहे.

## दी शिरपूर मर्चंट को-ऑप बँकेत १३. ७५ कोटींचा गैरव्यवहार

### तत्कालीन व्यवस्थापकास अटक




प्रतिनिधी । शिरपूर

**येथील दी शिरपूर मर्चंट को-ऑप बँकेतील तब्बल १३ कोटी ७५ लाख ७६ हजार २५३ रुपयांच्या अपहारप्रकरणी धुळे आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने गुन्ह्यातील मुख्य संशयित म्हणून बँकेचे तत्कालीन व्यवस्थापक संजय कुलकर्णी याला अखेर अटक केली. गुन्हा दाखल झाल्यानंतर तो फरार झाला होता.**

ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे आणि पोलीस उपअधीक्षक विश्वजीत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. याबाबत सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, २५ मे २०२५ रोजी दि. शिरपूर मर्चंट को-ऑप बँक लि. शिरपूरचे लेखापरीक्षक यांनी तक्रार शिरपूर शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. या गुन्ह्यात महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थामधील) हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम, १९९९ च्या कलम ३ सह अन्य गंभीर स्वरूपाच्या कलमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. तपासादरम्यान समोर आलेल्या माहितीनुसार, बँकेचे एकूण ४६ अधिकारी, कर्मचारी, चेअरमन आणि कर्जदार यांनी संगनमत करून तब्बल १३ कोटी ७५ लाख ७६ हजार २५३ रुपयांचा अपहार केल्याचा आरोप आहे. या गैरव्यवहारामुळे बँकेचे सभासद आणि ठेवीदार यांची मोठ्या प्रमाणावर आर्थिक फसवणूक झाल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. गुन्हा दाखल होताच संबंधित संशयित फरार झाले होते. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षकांनी दिलेल्या आदेशान्वये या गुन्ह्याचा पुढील तपास आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस उपअधीक्षक तथा (पान २ वर)

## जळगाव विधान परिषदेच्या निवडणुकीत तब्बल १६ उमेदवार रिंगणात

# वाढती अपक्षांची संख्या महायुतीचे गणित बिघडवणार?

प्रतिनिधी । जळगाव

**जिल्ह्यातील विधान परिषद स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाची निवडणूक यंदा अत्यंत चुरशीची आणि राजकीयदृष्ट्या प्रतिष्ठेची ठरण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यातील थेट लढत अपेक्षित असताना अचानक वाढलेल्या अपक्ष उमेदवारांच्या संख्येमुळे निवडणुकीचे समीकरण पूर्णपणे बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विशेषतः भुसावळचे माजी आमदार संतोष चौधरी यांचे बंधू अनिल चौधरी यांच्या उमेदवारीमुळे महायुतीसमोर अनपेक्षित आव्हान उभे राहिल्याची चर्चा सुरू आहे.**




मंगळवारी सर्व नामनिर्देशन पत्रांची छाननी होणार असून, त्यानंतर काही उमेदवारांचे अर्ज बाद होण्याची शक्यता नाकारता येत नाही. गुरुवारपर्यंत अर्ज माघारी घेण्याची मुदत असल्याने अनेक राजकीय घडामोडींना वेग येणार आहे. पक्षश्रेष्ठींकडून नाराजांची समजूत काढण्याचे प्रयत्न सुरू असून, काही अपक्ष उमेदवार माघार घेतील, अशी शक्यता व्यक्त होत आहे. मात्र, सध्याच्या स्थितीत बहुकोनी लढतीचे चित्र स्पष्ट दिसत आहे. याच कारणामुळे यंदाची निवडणूक महायुतीसाठी सोपी नसल्याचे चित्र आहे. अपक्ष उमेदवारांच्या वाढत्या हालचाली आणि मतांच्या संभाव्य विभाजनामुळे शेवटच्या क्षणापर्यंत या निवडणुकीत मोठी राजकीय उत्सुकता कायम राहण्याची शक्यता आहे.

विधान परिषदेच्या एका जागेसाठी आता तब्बल १६ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदारसंघातील निवडणुका साधारणपणे पक्षीय ताकद, गटबाजी आणि वैयक्तिक संपर्कांवर अवलंबून असतात. त्यामुळे अपक्ष उमेदवारांची वाढलेली संख्या अनेकांचे गणित बिघडवणारी ठरू शकते.

महायुतीमध्ये जागा वाटपावरून गेल्या काही दिवसांपासून पडद्यामागे जोरदार चर्चा सुरू होती. भाजप, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटामध्ये उमेदवारीबाबत एकमत होण्यास उशीर झाल्यामुळे शेवटच्या दिवसापर्यंत अधिकृत उमेदवाराची घोषणा झाली नव्हती. अखेर भाजपने नंदकिशोर महाजन यांना उमेदवारी जाहीर केली. मंत्री गिरीश महाजन यांचे निकटवर्तीय म्हणून त्यांची ओळख (पान २ वर)

# संपादकीय

## कर्नाटकी खांदेपालट !

सर्वाधिक काळ कर्नाटकच्या मुख्यमंत्रिपदी राहिलेले ज्येष्ठ नेते सिद्धरामय्या हे अखेर पायउतार होत असून उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांच्या गळ्यात अपेक्षेप्रमाणे नेतृत्वाची माळ पडत आहे. या निमित्ताने कर्नाटकात सुरू असलेल्या राजकीय अस्थिरतेला तूर्तास पूर्णविराम मिळेल. सत्तास्थापनेपासूनच अडीच वर्षांच्या संगीतखुर्चीचा हवाला देणारे शिवकुमार यांना त्यांची पक्षनिष्ठा आणि संयमाचेही फळ मिळाले. तर पक्षश्रेष्ठींनी सांगितले, तर राजीनामा देईन, असा पवित्रा घेणारे सिद्धरामय्या यांना राजी करण्यात पक्षनेतृत्वाला यश आल्याने खांदेपालटाचा हा अध्याय वरकरणी तरी फारशा कटुतेविना पार पडल्याचे दिसते. राजकारणात नेतृत्वाच्या पिढीमध्ये बदल ही अपरिहार्य बाब आहे. कर्नाटकातही सिद्धरामय्या यांचा वारस शोधणे बऱ्याच काळापासून अपेक्षित होते. भाजपात ही प्रक्रिया नित्यनेमाने आणि बहुतांश विनाअडचण पार पडते. मात्र दरबारी काँग्रेसचा खाक्याच वेगळा. त्यामुळेच राज्यातील बुजुर्गांना हटवणे, हा मांजराच्या गळ्यात घंटा बांधण्यासारखाच प्रकार होऊन बसतो. त्यातच अनेकदा कोणताही पेच अनिर्णित ठेवणे, हाच निर्णय असल्याची काँग्रेसची ठाम श्रद्धा. राजस्थान, पंजाब आणि छत्तीसगडमध्ये नव्या पिढीला वेळीच संधी न मिळाल्याने पक्षाला सत्ता गमवावी लागली, तर ज्योतिरादित्य शिंदे किंवा हिमंत बिस्व सरमा आदींनी पक्षाला सोडचिठ्ठीही दिली. आता काँग्रेसला या वास्तवाची जाणीव झाली, हे नशीब. तेलंगणमध्ये रेवंत रेड्डी आणि केरळममध्ये व्ही.डी.सतीशन यांच्यापाठोपाठ कर्नाटकातही सिद्धरामय्या यांची खुर्ची तुलनेने तरुण नेत्याकडे सोपवून काँग्रेसही जुन्या धेंडांची कात टाकण्याच्या तयारीत दिसून आली. आगामी निवडणुकांकडे पाहून का होईना, नेतृत्वबदलाच्या निर्णयाचे श्रेय राहुल गांधींना द्यावे लागेल. ज्येष्ठ नेते सिद्धरामय्या यांची प्रशासनावर मोठी पकड होती. दलित आणि मुस्लिमांची (अहिंद) मोट बांधण्याचे त्यांचे कौशल्य निर्विवाद होते. अशा बुजुर्गाला नारळ देण्याच्या परिणामांबाबत काँग्रेस साशंक होती. त्यांची जागा घेणारे शिवकुमार यांची संघटनेवर पकड असून, केंद्रीय सत्ताधाऱ्यांची खप्पामर्जी आणि तुरुंगवास सोसूनही ते काँग्रेसच्या झेंड्याखालीच राहिले. प्रदेशाध्यक्ष शिवकुमार हे साधनसंपत्तीनेही भरभक्कम आहेत. अनेकदा सत्तास्पर्धांमध्ये आमदारांना सुरक्षित स्थळी ठेवण्याच्या त्यांच्या रिसॉर्ट राजकारणाचा लाभही पक्षाने घेतला आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीपासूनच सिद्धरामय्या आणि शिवकुमार यांनी ब्रेकफास्ट डिप्लोमसीच्या निमित्ताने कटाक्षाने खेळीमेळीचा संदेश दिला. खुद्द सिद्धरामय्या यांच्या राजीनाम्याची घोषणाही याच न्याहरी बैठकीत झाली, तरीही गटबाजी लपून राहिलेली नव्हती. आताही नेतृत्व बदलानंतर सिद्धरामय्या यांच्या रूपाने कर्नाटकात समांतर सत्ताकेंद्र उभे राहण्याची चिंता आहेच. त्यांचे चिरंजीव यतिंद्र सिद्धरामय्या यांच्यासाठी उपमुख्यमंत्रिपदाच्या मागणीने जोर धरला आहे. त्याबरोबरच अन्यही गटांमध्ये राजकीय; तर अहिंद- लिंगायत समाजाला सामावून घेण्याचे सामाजिक संतुलनही शिवकुमार यांना साधावे लागेल. कर्नाटकातील सत्ताधारी पूर्ण बहुमताने पुन्हा सत्तेवर येण्याची परंपरा नाही, आता शिवकुमार दोन वर्षांनंतर येणाऱ्या निवडणुकीत पुन्हा सत्ता मिळवून देणार का, याची उत्सुकता आहे. तसेच लोकसभेला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जादू चालल्याने कर्नाटकात काँग्रेसला सहा खासदारांवर समाधान मानावे लागले. आता काँग्रेसच्या दक्षिण मोहिमेत कर्नाटकाला वाटा उचलावा लागेल. अर्थात, येडियुरप्पा यांच्यानंतर राज्यात भाजपकडे राज्यव्यापी नेतृत्व नाही. तसेच शिवकुमार यांच्या रूपाने आजवर धर्मनिरपेक्ष जनता दलाच्या पाठीशी उभा राहिलेल्या वोक्कलिग समाजाचे पाठबळ काँग्रेसला मिळू शकते. त्याशिवाय पक्षाच्या हक्काची ३५ टक्के मते आहेतच. सरकारांच्या पतनास कारणीभूत ठरणाऱ्या सत्तेचे फेव्हिकॉल अनेकांना एकत्र राहण्यासही भाग पाडते. त्याच जोरावर नवे मुख्यमंत्री राजकीय-सामाजिक संतुलन आणि मुख्य म्हणजे राज्याच्या विकासाचा गाडा कसा हाकणार हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

# नवीन वीज उपकेंद्रामुळे विकासाला चालना!

## पालकमंत्री जयकुमार रावल; बळसाणे येथे ३३ के.व्ही. नवीन सबस्टेशनचे भूमिपूजन

प्रतिनिधी । धुळे

**वीज कंपनीच्या नवीन उपकेंद्रामुळे साक्री तालुक्यातील बळसाणे परिसरातील वीज सुविधा अधिक सक्षम होऊन विकासाला गती मिळणार असून शेती, घरगुती वापर तसेच भविष्यातील औद्योगिक गरजांसाठी मोठी मदत होणार असल्याचे प्रतिपादन राज्याचे राजशिष्टाचार मंत्री तथा धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी केले.**



साक्री तालुक्यातील बळसाणे (सतमाने फाटा) येथे महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या वतीने उभारण्यात येणाऱ्या ३३/११ के. व्ही. नवीन उपकेंद्राच्या भूमिपूजन कार्यक्रमात पालकमंत्री श्री. रावल बोलत होते. यावेळी विद्युत विभागाचे अधीक्षक अभियंता सायस दराडे, कार्यकारी अभियंता भाऊसाहेब पाटील, अपर तहसीलदार अधिकार पेंढारकर, दोंडाईचा बाजार समितीचे सभापती नारायण पाटील, बळसाणेचे सरपंच ज्ञानेश्वर हालोरे, यांच्यासह लोकप्रतिनिधी, महावितरणचे अधिकारी, विविध विभागांचे अधिकारी, ग्रामस्थ व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. पालकमंत्री रावल म्हणाले की, वाढत्या वीज मागणीच्या पार्श्वभूमीवर नवीन उपकेंद्रामुळे परिसरातील वीजपुरवठा अधिक सक्षम, सुरळीत व दर्जेदार होणार आहे.

सिंचन, शेती, उद्योग, व्यावसायिक तसेच सर्वसामान्य नागरिकांना याचा थेट लाभ मिळेल. तसेच वीज यंत्रणेवरील ताण कमी होऊन भविष्यातील वाढती गरजही पूर्ण करता येणार आहे. शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडविण्यासाठी पाणी, वीज आणि शेतीमालाला योग्य भाव या बाबींवर शासनाचा भर आहे. नैसर्गिक संकटांचा सामना करत असताना शाश्वत विकासाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना सक्षम करण्याचे काम सुरू आहे. विहिरी, बंधारे, सिंचन सुविधा आणि शेतापर्यंत पाणी पोहोचविण्यासाठी विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. ते पुढे म्हणाले की, शिंदखेडा मतदारसंघात ऊर्जा क्षेत्रात महत्त्वपूर्ण कामे सुरू आहेत. शिंदखेडा शहरासाठी १३२ के. व्ही. चे मोठे सबस्टेशन उभारण्यात आले असून, शिरपूर येथे २२० के. व्ही. सबस्टेशन दहिवद परिसरातही ऊर्जा प्रकल्प उभारण्याचे काम सुरू आहे. धुळे जिल्ह्यात सिंचन, शिक्षण आणि उद्योग क्षेत्राचा विकास व्हावा यासाठी पालकमंत्री म्हणून सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. धुळे जिल्हा सोलर हब म्हणून विकसित होत असतांना येथील सौरऊर्जेचा लाभ सर्वप्रथम जिल्ह्यातील नागरिकांना मिळावा, यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी सांगितले. सिंचन, शिक्षण आणि उद्योग क्षेत्रातही जिल्ह्यात महत्त्वपूर्ण कामे सुरू आहेत, असेही पालकमंत्री श्री. रावल यांनी यावेळी सांगितले.

### उपकेंद्रामुळे बळसाणेसह बारा गावांना लाभ होणार

परिसरातील वीजपुरवठा मजबूत करण्यासाठी बळसाणे येथे ३३ के. व्ही. उपकेंद्र उभारण्यात येत असून त्यासोबत मुख्य व जोडणी लाईनची कामेही केली जाणार आहेत. या उपकेंद्रामुळे बळसाणे परिसरातील बळसाणे, कढरे, सतमाने, आगरपाडा, दुसाने, इंदवे, हट्टी, ऐचाळे, डोंगराळे तसेच अन्य तीन पाड्यांसह एकूण १२ गावांना लाभ होणार आहे. शेती, घरगुती वापर तसेच आगामी औद्योगिक विकासासाठीही हे उपकेंद्र महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### शेतकऱ्यांना सोलर पंपाची योजना लागू

शेतकरी बांधवांना सोलर पंपाची योजना लागू केली असून अनेक शेतकऱ्यांना त्याचा लाभ देण्यात आला. कुसुम योजनेच्या माध्यमातून ठिकठिकाणी सोलरचे हब निर्माण करण्यात येवून सोलर हबच्या माध्यमातून किमान २४ तास शेतकऱ्यांना मिळावी, यासाठी शासनामार्फत प्रयत्न करीत आहेत. धुळे जिल्हा हा भारतात सोलर हब म्हणून विकसित झाला. सोलरची वीज बॅटरीमध्ये स्टोअर करता येईल का यासाठी सरकारचे प्रयत्न होत असल्याचेही मंत्री रावल यांनी सांगितले.

# राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक

प्रतिनिधी । धुळे

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या १० जून रोजी होणाऱ्या पक्ष स्थापना दिनाच्या पार्श्वभूमीवर धुळे शहर विधानसभा आणि महापालिका क्षेत्रांतर्गत प्रमुख पदाधिकाऱ्यांची एक महत्त्वपूर्ण बैठक साक्री रोडवरील मिशन कम्पाऊंड येथे पार पडली.**

पक्षाचे ज्येष्ठ नेते जोसेफअण्णा मलबारी यांच्या नियोजनाखाली आणि माजी आ.प्रा.शरद पाटील यांच्या मुख्य नेतृत्वाखाली या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पक्षांतर्गत असलेले सर्व रुसवे-फुगवे, वादविवाद, मतभेद आणि मनभेद दूर करून सर्वांनी आगामी निवडणुकांच्या व पक्ष विस्ताराच्या कामाला लागावे, असे जाहीर आवाहन नेत्यांनी कार्यकर्त्यांना केले. या बैठकीत धुळे शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीने एकमुखाने अत्यंत महत्त्वाचा राजकीय ठराव मंजूर करण्यात आला.

दिवंगत नेते अजित पवार यांच्या संकल्पनेतून व माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रात लाडकी बहीण योजना यशस्वीपणे राबवली गेली. हाच वारसा पुढे नेण्यासाठी पक्षाचे हक्काचे असलेले अर्थ आणि नियोजन खाते सुनेत्रा वहिनींनाच देण्यात यावे, अशी आग्रही मागणी कार्यकर्त्यांनी केली. १० जूनच्या वर्धापन दिनानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे मोठे शक्ती प्रदर्शन केले जाणार आहे. पक्षात कोणतेही मतभेद नसून सर्वजण एकसंघ आहेत, असा संदेश याद्वारे दिला जाईल. वर्धापन दिनानंतर पक्ष संघटनेत व्यापक बदल केले जाणार असून, जेथे चांगले काम सुरू आहे त्यांना कायम ठेवत निष्क्रिय आघाड्या व संघटनांच्या ठिकाणी पुनर्रचना केली जाईल. या संदर्भातील सर्व अंतिम निर्णय सुनेत्रा पवार घेतील, असे बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

अजितदादांच्या विचारांचा वारसा पुढे घेऊन सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वात धुळे जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अधिक मजबूत करण्याचा दृढ संकल्प सर्व पदाधिकारी व शेकडो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत या बैठकीत करण्यात आला. बैठकीला जया साळुंखे, गितांजली जाधव, रंजना निकुंभे, प्रमोद साळुंखे, महेंद्र शिरसाठ, कांतिलाल दाळवाले, सचिन दीक्षित, शाम खोंडे, संजय अहिरे, गणेश धुळकर, आनंद सैंदाणे, अभिजीत देवरे, भानुदास पारोळेकर, सुल्तान शेख, कुंदन पवार, भोला वाघ, संतोष केदार, विशाल केदार, ज्ञानेश्वर माळी, नजीर शेख, उमेश दाळवाल, महाले आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# राष्ट्रधर्म साधना प्रशिक्षण गुरुकुलच्यावतीने आजपासून स्वसंरक्षण प्रशिक्षण शिबीर

प्रतिनिधी । नंदुरबार

**येथील डॉ.काणे गर्ल्स हायस्कूलच्या मैदानात १५ ते ४० वयोगटातील युवक आणि युवतींसाठी ११ दिवसीय शिवकालीन स्वसंरक्षण प्रशिक्षण शिबिर दि. ३ ते १३ जून दरम्यान राष्ट्र धर्म साधना प्रशिक्षण गुरुकुल यांच्या वतीने आयोजित करण्यात आले आहे.**

या प्रशिक्षणात स्वरक्षा तंत्र, लाठी काठी, लाठी काठी युद्ध, भाला, दांडपट्टा, दंडसाखळी, व्यायाम, हनुमान दंड बैठक, निशस्त्र युद्ध, चाकू पासून संरक्षण, प्रार्थना, मार्शल आर्ट, स्नायू मजबूत करणारी व्यायाम पद्धती आणि अजून भरपूर काही शिकायला मिळणार आहे. यासह युवकांनी सक्षम मानसिकता जोपासून स्वतः प्रशिक्षित होण्यासाठी मार्गदर्शन करण्यात येणार आहे. सकाळी ५.३० ते ७.३० आणि सायंकाळी ६ ते ८ या दोन वेळेत दररोज शिबीर पार पडणार आहे. याठिकाणी प्रवेशासाठी रजिस्ट्रेशन लिंक उपलब्ध करून देण्यात आली आहे.

# पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर जयंती उत्साहात साजरी

प्रतिनिधी । नंदुरबार

**जिल्हा धनगर समाजाच्यावतीने पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेला प्रतिम पूजन व अभिवादन सोहळा गांधी नगर, धुळे रोड येथील पेन्शनर हॉलमध्ये मोठ्या उत्साहात पार पडला.**



या कार्यक्रमासाठी प्रमुख मान्यवर म्हणून जिल्ह्याचे आ. चंद्रकांत रघुवंशी, उपनगराध्यक्ष प्रथमेश चौधरी, नगरसेवक रवी पवार, मोहित राजपूत, गौरव प्रकाश चौधरी, भरत चौधरी, देविदास पुरुषोत्तम चौधरी आदी मान्यवर व समाजाचे पदाधिकारी, महिलावर्ग व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच भाजपा जिल्हाध्यक्ष निलेश माळी, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभिजीत मोरे, भाजपा शहराध्यक्ष नरेश कांकरिया, नगरसेवक आकाश अहिरे यांच्यासह अनेक मान्यवरांनी कार्यक्रमस्थळी भेट दिली. कार्यक्रमाच्या प्रारंभी पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष आ. चंद्रकांत रघुवंशी यांनी आपल्या मनोगतातून अहिल्यादेवींच्या लोककल्याणकारी कार्याचा, न्यायप्रिय राज्यकारभाराचा व समाजसेवेच्या आदर्शाचा गौरवपूर्ण आढावा घेतला. त्यांच्या विचारांचे अनुकरण करून समाजहितासाठी कार्य करण्याचे आवाहन यावेळी त्यांनी केले. तसेच समाजाच्या वतीने सुरू असलेल्या सामाजिक भवन निर्माणाबाबत सर्वोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिपक धनगर तर सूत्रसंचालन सतीश काटके यांनी केले. आभार तुषार बच्छाव यांनी मानले.

# पान १ वरुन

**केरळमध्ये उद्या......**

विदर्भ आणि मराठवाड्यातील बहुतांश जिल्ह्यांवर वादळी पावसाचा प्रभाव आहे. तर काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची नोंद होत आहे. तर उत्तर कोकणातील काही भागात उष्ण आणि दमट वातावरणाची नोंद होत आहे. दरम्यान, हवामान विभागाकडून बुधवारसाठी राज्यातील बहुतांश भागांना वादळी पावसासाठी यलो अलर्ट देण्यात आला आहे. तर काही भागात हवामान कोरडे राहणार आहे.

**पश्चात्ताप झाला असेल......**

सत्तार यांच्या या वक्तव्याने महायुतीत वादाची ठिणगी पडली आहे. भाजपचे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सत्तारांच्या टीकेवरुन सत्तारांनी संबंधित वक्तव्य करण्यापूर्वी आपल्या नेत्यांची परवानगी घेतली होती का? असा प्रश्न विचारला आहे. तसेच अब्दुल सत्तार यांना तातडीने वरिष्ठ नेत्यांच्या बैठकीचे समन्स बजावण्यात आले आहे. अब्दुल सत्तार यांना तातडीने मुंबईत बोलावण्यात आल्याची चर्चा आहे. त्यांची आज संध्याकाळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत बैठक होणार असल्याची माहिती आहे.

**दी शिरपूर मर्चंट ......**

प्रभारी अधिकारी विश्वजीत जाधव यांच्याकडे सोपविण्यात आला. दरम्यान, या प्रकरणातील संशयितांनी अटक टाळण्यासाठी धुळे जिल्हा व सत्र न्यायालय तसेच उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज दाखल केले होते. मात्र दोन्ही न्यायालयांनी त्यांचे अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळून लावले आहेत. आर्थिक गुन्हे शाखेचे पथक संशयितांचा शोध घेत असताना आज (दि. १) या गुन्ह्यातील मुख्य संशयित संजय केशवराव कुलकर्णी याचा शिरपूर येथे ठावठिकाणा लागला. त्यानंतर त्याला ताब्यात घेऊन अटक करण्यात आली.

**वाढती अपक्षांची संख्या......**

असून, महायुतीने ही निवडणूक प्रतिष्ठेची केल्याचे स्पष्ट झाले आहे.दुसरीकडे, महाविकास आघाडीतर्फे शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार शरद तायडे मैदानात उतरले आहेत. जळगाव जिल्ह्यात ठाकरे गटाने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये काही प्रमाणात प्रभाव टिकवून ठेवला असून, त्यांच्यासह महायुतीतील नाराजांची साथ मिळाल्यास तायडे यांची लढतही लक्षवेधी ठरू शकते. महाविकास आघाडीनेही या निवडणुकीत महायुतीला थेट आव्हान देण्याची रणनीती आखल्याचे दिसत आहे.मात्र, संपूर्ण निवडणुकीत सर्वाधिक चर्चेचा विषय ठरले आहेत ते अपक्ष उमेदवार अनिल चौधरी. अर्ज दाखल करण्यापूर्वी त्यांनी केलेली नगरसेवकांची मोठी जमवाजमव आणि स्थानिक पातळीवर दाखवलेली ताकद राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय बनली आहे. काही नाराज लोकप्रतिनिधी आणि स्थानिक गट त्यांच्यासोबत असल्याची चर्चा असून, त्याचा थेट परिणाम राजकीय पक्षांनी दिलेल्या अधिकृत उमेदवारांच्या मतांवर होऊ शकतो.

विशेषतः महायुतीमधील अंतर्गत नाराजी आणि स्थानिक पातळीवरील गटबाजीमुळे मतांचे विभाजन होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. जळगाव शहरातील राजकीय समीकरणांमध्ये गेल्या काही वर्षांत मोठे बदल झाले आहेत. भाजपचे वर्चस्व कायम असले तरी अनेक ठिकाणी स्थानिक पातळीवरील मतभेद उघडपणे समोर येत आहेत. काही नाराज पदाधिकारी आणि लोकप्रतिनिधी अधिकृत उमेदवारांबाबत नाराजी व्यक्त करत असल्याची चर्चा आहे. त्यामुळे अपक्ष उमेदवारांना अप्रत्यक्ष पाठबळ मिळण्याची शक्यता राजकीय जाणकार व्यक्त करत आहेत.

**क्रिकेट कॅम्पमध्ये खेळपट्टी......**

जात होता. प्रशिक्षकांच्या सांगण्यावरून हा मुलगा इतर मुलांसोबत मिळून तो अवजड रोलर ओढत होता. मात्र, अचानक तोल गेल्याने आरव त्या जड रोलरच्या खाली आला. रोलरचे वजन जास्त असल्याने तो गंभीररीत्या चिरडला गेला आणि त्यातच त्याचा मृत्यू झाला. पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, लहान मुलांकडून एवढे मोठे आणि जोखमीचे काम करून घेतले जात असताना घटनास्थळी एकही प्रौढ व्यक्ती किंवा पर्यवेक्षक उपस्थित नव्हता. मुले कोणत्याही सुरक्षेविना आणि मार्गदर्शनाशिवाय तो जड रोलर ओढत होती. इतक्या लहान मुलांकडून असं धोकादायक काम करून घेताना तिथे सुरक्षेची कोणतीही काळजी घेतली गेली नव्हती, अशी माहिती एका पोलीस अधिकाऱ्याने दिली.

# धडगाव येथे ८ जून रोजी भील समाजाची ऐतिहासिक महापंचायत

प्रतिनिधी । तळोदा

**आदिवासी भील समाजातील अनिष्ट प्रथांग मूठमाती देण्यासाठी आणि समाजात परिवर्तनाची नवी पहाट आणण्यासाठी येत्या दि. ८ जून रोजी धडगाव येथे एका ऐतिहासिक महापंचायतीचे आयोजन करण्यात आले आहे.**

आदिवासी भील समाजाला निसर्गाची आणि समृद्ध संस्कृतीची मोठी परंपरा लाभली आहे. मात्र, बदलत्या काळासोबत समाजात काही अनिष्ट प्रथांनी शिरकाव केला आहे. आजच्या आधुनिक युगातही हुंडासारख्या अमानुष प्रथेमुळे अनेक गरीब कुटुंबांना कर्जबाजारी व्हावे लागत आहे. धक्कादायक बाब म्हणजे, काही ठिकाणी मुलींचे समाजाच्या विविध प्रथांवर चर्चा होणार असून वडील मुलाच्या आई-वडिलांकडून अवाजवी आणि मोठी रक्कम हुंडा म्हणून मागत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. यामुळे मुलाच्या कुटुंबाचे मोठे आर्थिक आणि मानसिक शोषण होत आहे. या मनमानी कारभाराला चाप लावण्यासाठी, हुंडा मागणाऱ्यांवर समाजातर्फे मोठा आर्थिक दंड ठोठावण्यात यावा आणि थेट फौजदारी गुन्हा दाखल करावा, अशी आग्रही मागणी होत आहे.

# धुळ्यात लवकरच होणार २८ ई-बस दाखल

प्रतिनिधी । धुळे

**धुळे शहराच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत महत्त्वपूर्ण बदल घडवून आणणाऱ्या ई-बस प्रकल्पाला वेग आला असून शहरासाठी मंजूर करण्यात आलेल्या २८ अत्याधुनिक ई-बस लवकरच नागरिकांच्या सेवेत दाखल होणार आहेत.**

या प्रकल्पासाठी शासनाकडून सुमारे सहा कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून त्याअंतर्गत ई-बस चार्जिंग स्टेशनसह आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्यात येत आहेत. मोहाडी येथील रेसिडेन्सी पार्कजवळील सुमारे २.५० हेक्टर जागेवर अत्याधुनिक ई-बस चार्जिंग स्टेशन, बस पार्किंग परिसर, तांत्रिक सुविधा तसेच प्रशासकीय कक्ष उभारण्यात येत आहेत. या प्रकल्पाचे काम सध्या अंतिम टप्प्यात असून सुमारे ९० टक्के काम पूर्ण झाले आहे. या पार्श्वभूमीवर खा. डॉ. शोभा बच्छाव यांनी महापालिका अधिकाऱ्यांसमवेत प्रकल्पस्थळी भेट देऊन कामाची पाहणी केली. यावेळी त्यांनी चार्जिंग स्टेशन, बस पार्किंग व्यवस्था, विद्युत यंत्रणा तसेच इतर पायाभूत सुविधांचा आढावा घेतला. संबंधित अधिकाऱ्यांनी प्रकल्पाच्या प्रगतीबाबत माहिती सादर केली. या पाहणीदरम्यान महापालिकेचे उप आयुक्त हेमंत निकम, कार्यकारी अभियंता चंद्रकांत उगले व संबंधित अधिकारी, अभियंते तसेच प्रकल्पाशी निगडित अधिकारी, काँग्रेस पक्षाचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष युवराज करनकाळ, शहराध्यक्ष साबीर शेठ, रमेश श्रीखंडे, पितांबर महाले, दिशा समिती सदस्य सुनील शिंदे आदी उपस्थित होते. डिझेलवर चालणाऱ्या पारंपरिक बसांच्या तुलनेत ई-बसमुळे वायू व ध्वनी प्रदूषणात घट होणार असून इंधन बचतीलाही हातभार लागणार आहे. या प्रकल्पाचे काम निर्धारित वेळेत पूर्ण करून ई-बस सेवा नागरिकांसाठी लवकर सुरू करण्याबाबत चर्चा केली.

# कर्ले ग्रामपंचायततर्फे कर्तबगार महिलांचा गौरव

प्रतिनिधी । दोंडाईचा

**कर्ले ता. शिंदखेडा ग्रामपंचायतीच्या वतीने राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त कर्तबगार महिलांना पुण्यशोक अहिल्याबाई होळकर महिला सन्मान पुरस्कार प्रदान करण्यात करण्यात आला.**



यावर्षी हा मानाचा पुरस्कार अर्चना अनिल देवरे, अलकाबाई चुडामण शिंदे आणि शानूबाई देविदास हालोर या कर्तबगार महिलांना जाहीर करण्यात आला होता त्यानुसार आज ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच सिमा दिनेश ठाकरे यांच्या हस्ते या कर्तबगार महिलांना पुरस्कार देण्यात आला अर्चना अनिल देवरे यांनी आपल्या पतीच्या दुर्धर आजाराच्या काळात अत्यंत जिद्दीने कुटुंबाची जबाबदारी सांभाळली. त्यांनी रुग्णालयातील उपचारांची काळजी घेतलीच, शिवाय घर आणि किराणा दुकानाचा व्यवसायही समर्थपणे चालवला. मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष देऊन त्यांना उच्चशिक्षित केले. आज त्यांचा मुलगा पुण्यात उच्च पदावर कार्यरत असून कुटुंबाचे नाव उज्ज्वल करत आहे.

या तिन्ही कर्तबगार महिलांचा गौरव ग्रामपंचायतीच्या वतीने करण्यात येणार आला. यावेळी सरपंच सिमा दिनेश ठाकरे, उपसरपंच पंडित वाघ, माजी सरपंच दगाजी देवरे, दिनेश ठाकरे, पोलिस पाटील प्रफुल्ल पाटील, ग्रामपंचायत सदस्य संगीता चव्हाण, रमेश मोरे, दिनेश देवरे, शिवराम सोनवणे, दिनेश पाटील, देविदास हालोरे, भास्कर ठाकरे, चंद्रकांत चव्हाण, दिलीप शिरसाट, आकाश पवार, चुनीलाल मिस्त्री, वकील शिंदे, अर्चना अनिल देवरे, शानुबाई देविदास पाटील, अलकाबाई चुडामण शिंदे, कोकिळा पाटील, वैशाली शिंदे, पूनम पाटील, अरुणा पाटील, ज्योतीबाई चव्हाण, बेबीबाई बच्छाव, ग्रामपंचायत कर्मचारी सागर चव्हाण, दादाभाऊ ठाकरे, रतिलाल पगारे, शशिकांत चव्हाण, अविनाश चव्हाण आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन आकाश पवार यांनी केले.

# पोस्टमास्तर विजय पाटील सेवानिवृत्तनिमित्त सत्कार

प्रतिनिधी । शहादा

तालुक्यातील वैजाली येथील भारतीय पोस्ट विभागाचे डाकघर सहाय्यक पोस्टमास्तर विजय कौतिक पाटील यांच्या सेवानिवृत्तीबाबत ग्रामस्थ परिसरातील नागरिक व नातेवाईक यांच्या वतीने सपत्नीक सत्कार करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पोस्ट विभागाच्या सेवानिवृत्त पोस्टमास्तर सौ इंदुबाई पाटील होत्या तर प्रमुख अतिथी माजी सरपंच श्रीराम पाटील, माजी उपसरपंच गणेश पाटील, विनोद पाटील, पंकज पाटील, भाजपाचे संजय पाटील प्रवीण पाटील, गुलाब ठाकरे, त्र्यंबक पाटील, संजय साळुंखे, राकेश पाटील, विनोद साळुंखे, गिरीश पाटील उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी (मोबा.- ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✲ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (✲ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

## दिन विशेष...

१९३६ : आल इंडिया रेडिओची स्थापना

१९१६ : 'भारतीय महिला विद्यापीठ' या संस्थेची स्थापना. १०२९ मध्ये 'श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठ' असे नामांतर

१८९० : महान चित्रकार व शिल्पकार बाबूराव पेंटर यांचा कोल्हापूर येथे जन्म

## थोडक्यात

### दीड महिन्यांपूर्वी लग्न झालेल्या तरुणाची आत्महत्या

**जळगाव ।** दीड महिन्यांपुर्वी लग्न झालेल्या अक्षय रविंद्र पाटील (वय २४, रा. खेडी, ता. जळगाव) या तरुणाने दि. ३१ मे रोजी राहत्या घरात आत्महत्या केली. या तरुणाच्या मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट झाले नसून याप्रकरणी पोलिसात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. जळगाव तालुक्यातील खेडी येथे अक्षय पाटील हा तरुण वास्तव्यास होता गेल्या महिन्यात दि. ११ एप्रिल रोजी त्याचा विवाह झाला होता. त्यानंतर दि. ३० मे रोजी दीड महिन्यातच अक्षय याने राहत्या घरात स्वतःला संपविल्याची घटना घडली. घरात तो बेशुद्ध अवस्थेत मिळून आल्यामुळे त्याला कुटुंबियांनी तात्काळ जिल्हा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल केले. याठिकाणी डॉक्टरांनी तपासणी करीत त्याला मयत घोषीत केले. यावेळी नातेवाईकांनी जिल्हा रुग्णालयातच प्रचंड आक्रोश केला. घटनेची माहिती मिळताच त्याच्या मित्रांसह नातेवाईकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. मयत अक्षय पाटील याच्या आत्महत्येचे कारण अद्याप अस्पष्ट आहे.

### काँग्रेस कमिटीचा ५ रोजी पदग्रहण सोहळा

**जळगाव ।** ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या वतीने दि. २१ मे रोजी जाहीर करण्यात आलेल्या नवीन जिल्हाध्यक्षांच्या नियुक्त्यांमध्ये जळगाव जिल्ह्याचाही समावेश करण्यात आला होता. या नियुक्त्यांनुसार जळगाव जिल्ह्याचे तीन विभाग करण्यात आले असून, जळगाव जिल्हा पूर्वसाठी धनंजय शिरीष चौधरी, जळगाव शहर काँग्रेस कमिटीसाठी जमील शेख, तर जळगाव जिल्हा पश्चिमसाठी ॲड. अविनाश भालेराव यांची जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. यासंदर्भात तिन्ही जिल्हाध्यक्षांनी सांगितले की, प्रत्येक जिल्ह्याचा पदग्रहण सोहळा स्वतंत्रपणे, वेगवेगळ्या दिवशी आयोजित करण्यात येणार आहे. त्यानुसार जळगाव जिल्हा पश्चिम काँग्रेस कमिटीचा पदग्रहण सोहळा दि. ५ जून रोजी जळगाव जिल्हा काँग्रेस कमिटीच्या कार्यालयात आयोजित करण्यात येणार आहे. तसेच जळगाव शहर काँग्रेस कमिटीचा पदग्रहण सोहळा दि. १३ जून तर जळगाव जिल्हा पूर्व काँग्रेस कमिटीचा पदग्रहण सोहळा दि.२१ जून रोजी आयोजित करण्यात येणार आहे.

# थकित मानधनासाठी राज्यव्यापी काम बंद आंदोलन

## पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांचा शासनाला इशारा; दुसऱ्या टप्प्यात ८ जून रोजी आंदोलन तीव्र करणार

प्रतिनिधी । जळगाव

**महाराष्ट्र राज्य गट संसाधन केंद्र (पाणी व स्वच्छता) कंत्राटी कर्मचारी संघटनेच्या वतीने पंचायत समिती अंतर्गत कार्यरत असलेल्या गट संसाधन केंद्रातील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मानधनाच्या प्रश्नावर राज्य सरकारला निवेदन देण्यात आले असून, मागण्या मान्य न झाल्यामुळे १ जूनपासून राज्यव्यापी काम बंद आंदोलन करण्यात आले आहे.**



सदर निवेदन पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री ना. गुलाबराव पाटील यांना देण्यात आले असून, राज्यातील पंचायत समिती अंतर्गत पाणी व स्वच्छता विभागात कार्यरत गट समन्वयक व समूह समन्वयक कर्मचारी अनेक वर्षांपासून प्रामाणिकपणे सेवा बजावत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील पाणी पुरवठा योजना, स्वच्छ भारत अभियान तसेच जल जीवन मिशन यांसारख्या महत्त्वाकांक्षी योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी हे कर्मचारी सातत्याने कार्यरत असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे. मात्र, मागील डिसेंबर २०२५ ते एप्रिल २०२६ या कालावधीतील तब्बल पाच महिन्यांचे मानधन अद्याप मिळाले नसल्याचा आरोप कर्मचाऱ्यांनी केला आहे. जून महिना सुरू झाला असून एकूण सहा महिन्यांपासून मानधन मिळाले नसल्याने कर्मचाऱ्यांवर आर्थिक संकट ओढावले आहे. घरखर्च, मुलांचे शिक्षण, वैद्यकीय खर्च आणि दैनंदिन गरजा भागविणे कठीण झाले असल्याची व्यथा कर्मचाऱ्यांनी निवेदनातून मांडली आहे. यापूर्वीही वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे वारंवार तोंडी व लेखी पाठपुरावा करूनही केवळ आश्वासने मिळाली. मात्र, प्रत्यक्षात कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

शासनाच्या उदासीन भूमिकेमुळे कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. संघटनेच्या प्रमुख मागण्यांमध्ये प्रलंबित संपूर्ण मानधन तात्काळ कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात जमा करणे, तसेच मानधनाचा प्रश्न कायमस्वरूपी निकाली काढणे यांचा समावेश आहे. ३० मे २०२६ पर्यंत प्रश्न सुटला नाही म्हणून १ जूनपासून राज्यभरातील गट संसाधन केंद्रातील कर्मचारी पूर्ण वेळ काम बंद आंदोलनात सहभागी झाले आहेत. आंदोलनाच्या पहिल्या टप्प्यात १ ते ५ जूनदरम्यान जिल्हा परिषद कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. दुसऱ्या टप्प्यात ८ जून रोजी राज्यस्तरीय कंत्राटी कर्मचारी जिल्हाधिकारी कार्यालय जळगाव ते मंत्री गुलाबराव पाटील यांच्या निवासस्थानापर्यंत पायी यात्रा काढून धरणे आंदोलन करणार आहेत.

तिसऱ्या टप्प्यात मागण्या मान्य होईपर्यंत राज्यव्यापी काम बंद आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार संघटनेने व्यक्त केला आहे. या आंदोलनामुळे पाणी व स्वच्छता विभागाचे विविध कामकाज ठप्प होण्याची शक्यता असून, त्यातून निर्माण होणाऱ्या परिस्थितीस शासन आणि प्रशासन जबाबदार राहील, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. सदर निवेदनावर राज्य सचिव जयंत वर्मा आणि राज्याध्यक्ष विलास निकम तसेच जिल्हा अध्यक्ष शिरीष तायडे व जिल्हा सचिव ज्ञानेश्वर पाटील यांच्या स्वाक्षऱ्या असून, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, प्रधान सचिव, अभियान संचालक, जिल्हाधिकारी तसेच संबंधित विभागीय अधिकाऱ्यांना निवेदनाच्या प्रती पाठविण्यात आल्या आहेत.असे जिल्हाध्यक्ष शिरीष तायडे व सचिव ज्ञानेश्वर पाटील यांनी कळविले आहे.

## शासकीय दंत महाविद्यालयातर्फे तंबाखूविरोधी जनजागृती

प्रतिनिधी । जळगाव

**येथील शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव यांच्यावतीने शासकीय जळगाव बसस्थानक येथे सकाळी १०:३० वाजता तंबाखूविरोधी जनजागृती मोहीम राबविण्यात आली.**





या कार्यक्रमाच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेमध्ये तंबाखूच्या घातक दुष्परिणामांविषयी मोठ्या प्रमाणावर जागरूकता निर्माण करण्यात आली. सदर कार्यक्रम महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. जगदीशचंद्र वाठार यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पार पडला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शैक्षणिक प्रभारी डॉ. गिरीश नाझिरकर उपस्थित होते. डॉ. भरत एस. यांनी तंबाखूचे सेवन आणि त्यामुळे आरोग्याला होणारे गंभीर आजार व दुष्परिणाम याबद्दल सविस्तर माहिती दिली. या मोहिमेदरम्यान माहितीपूर्ण भितीपत्रके, मौखिक आरोग्यविषयक चर्चा आणि थेट लोकसहभागाच्या माध्यमातून नागरिकांना तंबाखूमुक्तीचे आवाहन करण्यात आले.

जळगाव बसस्थानकावरील प्रवाशांनी आणि नागरिकांनी या मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या प्रसंगी महाविद्यालयातील डॉ. राहुल चौधरी, डॉ. हितेश देसरडा, डॉ. प्रतिभा सुलताने, डॉ. प्रियंका माळ प्रामुख्याने उपस्थित होते.

## भटक्या श्वान नियंत्रणासाठी काटेकोर अंमलबजावणी करा: जिल्हाधिकारी

प्रतिनिधी । जळगाव

**भटक्या श्वानांच्या वाढत्या समस्येच्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांची जळगाव जिल्ह्यात प्रभावी आणि काटेकोर अंमलबजावणी करण्यात यावी, असे आदेश जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांना दिले आहेत.**

यासंदर्भात आयोजित आढावा बैठकीत महानगरपालिका, नगरपालिका, ग्रामपंचायत तसेच संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या. याबैठकीस अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रणधीर सोमवंशी, पशुसंवर्धन विभागाचे उपायुक्त डॉ.प्रदीप झोड यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी जिल्ह्यातील सर्व शासकीय व खासगी शैक्षणिक संस्था, रुग्णालये, सार्वजनिक क्रीडा संकुले, बसस्थानके, आगार तसेच रेल्वे स्थानकांची सविस्तर यादी तयार करण्याचे निर्देश दिले. तसेच संबंधित संस्थांनी आपल्या परिसरात भटक्या श्वानांचा प्रवेश रोखण्यासाठी आवश्यक कुंपण, संरक्षक भिंती व सुरक्षित प्रवेशद्वारांची व्यवस्था करावी, असे स्पष्ट करण्यात आले. महानगरपालिका व नगरपालिकांनी आवश्यक मान्यता घेऊन जन्मनियंत्रण केंद्रे स्थापन करावीत. तसेच पुढील सहा महिन्यांत कार्यक्षेत्रातील सर्व भटक्या श्वानांचे निर्बिजीकरण पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. निर्बिजीकरण झालेल्या श्वानांना त्यांच्या मूळ ठिकाणी परत न सोडता एडब्ल्यूबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार प्राणी निवारा केंद्रात ठेवण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.याशिवाय, जिल्ह्यातील सर्व शासकीय व खासगी रुग्णालयांनी रेबीज प्रतिबंधक लस तसेच इम्युनोग्लोब्युलिनचा पुरेसा साठा उपलब्ध ठेवावा, असे आदेशही जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.स्थानिक स्वराज्य संस्थांनी जन्मनियंत्रण विभाग व प्राणी निवारा केंद्र उभारण्यासाठी तातडीने योग्य जागेची निवड करून आवश्यक कार्यवाही सुरू करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले. या बैठकीस जिल्ह्यातील विविध नगरपालिकांचे मुख्याधिकारी, जिल्हा परिषदांचे गटविकास अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते. तर पशुसंवर्धन विभाग, महानगरपालिका व इतर संबंधित विभागांचे अधिकारी प्रत्यक्ष उपस्थित होते. भटक्या श्वानांच्या समस्येवर नियंत्रणासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार जिल्हास्तरावर व्यापक उपाययोजना राबविण्याचा निर्धार व्यक्त केला.

## धनगर समाजातर्फे अहिल्यादेवी होळकर जयंती उत्साहात

प्रतिनिधी । धरणगाव

**येथील धनगर समाजाच्या वतीने राष्ट्रमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या स्मारकाजवळ प्रतिमापूजन करुन अभिवादन केले.**

यावेळी समाजाचे अध्यक्ष शरद कंखरे, उपाध्यक्ष राजू न्हायदे व पंचमंडळाच्या सदस्यांनी अहिल्यादेवींच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. कार्यक्रमास हिलाल बच्छाव, गणेश देवरे, हिरामण देवरे, रमण सोनवणे, सम्राट सोनवणे, समाधान न्हायदे, गोविंद मनोरे, गुलाब न्हायदे, हरचंद रत्नपारखी, अर्जुन सोनवणे, राजेंद्र बिऱ्हाडे, भैय्या धनगर यांच्यासह विविध सामाजिक व राजकीय संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते. यावेळी नगरसेवक भूषण कंखरे यांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा गौरवपूर्ण आढावा घेत अहिल्यादेवी या न्यायप्रिय, दूरदर्शी व लोककल्याणकारी शासक होत्या.



त्यांच्या राज्यकारभाराचा केंद्रबिंदू सत्ता नसून समाज होता. प्रजेच्या सुखासाठी त्यांनी संपूर्ण आयुष्य समर्पित केले. अहिल्यादेवींनी देशभरात घाट, मंदिरे, धर्मशाळा, विहिरी, तलाव व रस्त्यांची उभारणी करून राष्ट्रनिर्माणात मोठे योगदान दिले. काशी विश्वनाथ मंदिराचा जीर्णोद्धार, सोमनाथ मंदिराचे पुनर्बांधकाम तसेच अनेक तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी त्यांनी केलेले कार्य आजही प्रेरणादायी आहे.महिला सक्षमीकरण आणि लोकाभिमुख प्रशासन आदर्श अहिल्यादेवींनी घालून दिला असे भूषण कंखरे यांनी नमूद केले.

## पोलिस दलात बदल्यांसाठी वशिला बंद: ढिवरे

प्रतिनिधी । जळगाव

**जिल्हा पोलिस दलातील पोलिस अंमलदारांची बदली प्रक्रिया गेल्याच आठवड्यात पार पडली. मात्र, नेहमीच्या सवयीनुसार बदली प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरही सोयीचे ठिकाण मिळवण्यासाठी अनेकांकडून फिल्डिंग लावली जाते. या पार्श्वभूमीवर पोलिस अधीक्षक श्रीकांत धिवरेंनी अशा फिल्डिंग बहाद्दरांना झटका दिला आहे.**

आता बदल्यांसाठी कोणत्याही प्रकारची भेट चालणार नसल्याचे स्पष्ट करत, एसपींनी आपल्या कार्यालयाबाहेर थेट तसे आदेशच फलकावर लावले आहेत. गेल्या आठवड्यात जळगाव जिल्हा पोलिस दलातील अंमलदारांच्या बदल्यांची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाली. अनेक कर्मचाऱ्यांना आपल्या पसंतीचे ठाणे किंवा विभाग हवा असल्याने त्यांनी अंतर्गत हालचाली सुरू केल्या होत्या. काही जणांकडून थेट पोलिस अधीक्षकांना भेटून किंवा इतर माध्यमातून दबाव आणून बदली बदलून घेण्याचे प्रयत्न सुरू झाले होते. शेवटी पोलिस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी थेट आदेश काढत, अनेकांकडून लावण्यात येणारी बदल्यांची फिल्डिंगच फ्लॉप केली आहे. बदलीसाठी होणारी गर्दी आणि वशिलेबाजी रोखण्यासाठी पोलिस अधीक्षकांच्या कार्यालयाबाहेर जाहीर फलक लावण्यात आला आहे. सर्वसाधारण बदल्या व विनंती बदली संदर्भातील कामकाज पूर्ण झाले आहे. आता पोलिस अंमलदारांनी बदल्यांसंदर्भात पोलिस अधीक्षकांना भेटू नये,असा फतवा त्यांनी काढला आहे.

## आरसेटी जळगाव येथे जिल्हाधिकाऱ्यांची भेट



प्रतिनिधी । जळगाव

**ग्रामीण भागातील तरुण आणि महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी आरसेटी संस्था अत्यंत महत्त्वपूर्ण कार्य करत आहे. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून, जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी आरसेटी जळगाव केंद्राला प्रत्यक्ष भेट दिली.**

या कार्यक्रमाला सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे अग्रणी जिल्हा व्यवस्थापक सुनील दोहरे, आरसेटी जळगावचे संचालक सत्यनारायण दास, सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे वरिष्ठ व्यवस्थापक जतीन वालेचा तसेच विष्णू देबाजे, अनिता पाटील, संजीवनी मोरे, दिग्विजय खंबायत, सचिन मराठे, अश्विन मराठे, कल्पेश ढिवरे, विनोद पाटील उपस्थित होते.

## न्यायप्रक्रिया अधिक गतिमानतेसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे आवश्यक

### माउंट आबू येथे अखिल भारतीय परिषदेत न्यायमूर्ती गुरुपालसिंग अहलुवालिया यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी । धरणगाव

**न्यायप्रक्रिया अधिक गतिमान व प्रभावी करण्यासाठी खालच्या न्यायालयांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन न्यायमूर्ती गुरुपाल सिंग अहलुवालिया यांनी केले. न्यायालयीन कामकाजातील डिजिटल परिवर्तनामुळे नागरिकांना जलद व सुलभ न्याय मिळण्यास मदत होईल, असे त्यांनी नमूद केले.**





राजस्थानातील प्रसिद्ध असलेल्या माउंट आबू येथे प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयातर्फे मूल्य आधारित न्याय या विषयावर चार दिवसीय अखिल भारतीय परिषद व चिंतन शिबिराचे आयोजन केले होते. त्याप्रसंगी ते बोलत होते. देशभरातील न्यायाधीश, विधिज्ञ, कायदेतज्ज्ञ आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थिती लाभली होती. या परिषदेत धरणगाव येथील कायदा व न्यायव्यवस्थेच्या क्षेत्रातील नामांकित वकिलांच्या शिष्टमंडळाने सक्रिय सहभाग नोंदविला. या परिषदेस मध्यप्रदेश उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती गुरुपाल सिंग अहलुवालिया, जालोर ग्राहक न्यायालयाचे न्यायाधीश एस. यादव तसेच बेळगाव जिल्हा न्यायाधीश यांची विशेष उपस्थिती लाभली. यावेळी सुप्रसिद्ध प्रेरणादायी वक्त्या बी.के. शिवानी दीदी यांनी उपस्थितांना मूल्याधिष्ठित जीवनशैली, सकारात्मक विचारसरणी आणि न्यायव्यवस्थेतील नैतिकतेचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले. या परिषदेत धरणगाव येथील ॲड. बापूराव आवारे, ॲड. संजय महाजन, ॲड. महेंद्र चौधरी, ॲड. गणेश मांडगे, ॲड. दिनकर पाटील आणि ॲड. आकाश महाजन यांची विशेष उपस्थिती होती. त्यांनी विविध सत्रांमध्ये सहभाग घेत न्यायव्यवस्थेतील बदलत्या आव्हानांवर चर्चा केली. चार दिवसीय चिंतन शिबिरातून न्यायव्यवस्थेत मानवी मूल्ये आणि नीतिमत्तेची जोपासना करण्याचा संकल्प अधिक दृढ झाला.

# विद्यार्थ्यांनी सुप्त कलागुणांना वाव देणे गरजेचे!

## • कान्ह ललित कला केंद्रातर्फे आयोजित अभिनय कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी डॉ. मृणालिनी फडणवीस यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी । जळगाव

**विद्यार्थ्यांनी आपल्या सुप्त इच्छा प्रकट करण्याचे प्रभावी माध्यम म्हणजे नाटक होय. यातून त्यांनी धडे घेत आपले उद्दिष्ट्ये प्राप्त केले पाहिजे. त्यांनी आपल्या सुप्त कलागुणांना वाव देणे गरजेचे आहे,असे प्रतिपादन के.सी.ई. सोसायटीच्या शैक्षणिक संचालक डॉ. मृणालिनी फडणवीस यांनी केले. कान्ह ललित कला केंद्रातर्फे आयोजित अभिनय-२०२६ कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या.**

दि. १ जून ते १० जून अशा १० दिवसीय अभिनय कार्यशाळेचे आयोजन येथील नाट्यशास्त्र विभागातर्फे करण्यात आले आहे. ही कार्यशाळा सकाळी ८ ते दुपारी १ या कालावधीत होत आहे. यात एकूण २० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला असून दि. १ जून रोजी या कार्यशाळेचे उद्‌घाटन के.सी.ई. सोसायटीचे कान्ह ललित कला केंद्राचे संचालक डॉ.जयेंद्र लेकुरवाळे, मनभावन रेडिओचे अमोल देशमुख, शुभांगी बडगुजर, हास्यजत्रा फेम हेमंत पाटील, डॉ.वैभव मावळे, नृत्य प्रशिक्षक प्रा.अजय शिंदे, डॉ. सचिन कुंभार यांची उपस्थिती लाभली होती. कान्ह ललित कला केंद्रातर्फे अभिनय कार्यशाळेचे आयोजन ही एक पर्वणी असून तज्ज्ञ मार्गदर्शकांकडून विद्यार्थ्यांना अभिनयाचे धडे मिळत असून ही गौरवाची बाब असल्याचे मत यावेळी डॉ. जयेंद्र लेकुरवाळे यांनी मांडले. या विद्यार्थ्यांना भविष्यात मालिका, नाटक किंवा चित्रपटात काम करण्याची मोठी संधी असून त्यांना हवी ती मदत संस्था करणार असल्याचे आश्वासनही त्यांनी यावेळी दिले. कान्ह ललित कला केंद्रातर्फे होणाऱ्या उपक्रमांची माहिती देत शिबिरार्थींनी आपल्या भावविश्वाला गवसणी घालण्याचे हे उत्तम माध्यम असून सिनेअभिनेते आणि लेखक डॉ. सुधीर निकम आणि दिग्दर्शक -लेखक सुनील हरिश्चंद्र यांच्यासारखी मोठी मंडळी विद्यार्थ्यांना ज्ञानार्जनाचे धडे देणार असल्याचे डॉ. वैभव मावळे यांनी प्रास्ताविकात मांडले. यावेळी सूत्रसंचालन प्रा. प्रसाद देसाई यांनी केले. यशस्वितेसाठी दिनेश माळी, कृतिका कोरे, धनश्री शिंपी, गोपाल मोरे, रोनक तडवी, मयूर तायडे, पवन निकम, अभय साळुंखे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन केंद्राचे समन्वयक प्रसाद देसाई यांनी मानले.





> विद्यार्थ्यांना हक्काचे व्यासपीठ मिळाले असून याचा योग्य सदुपयोग करणे गरजेचे आहे. या कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यार्थी आपल्या भावविश्वाला समजून घेत ते प्रत्यक्षात आणण्याचा नक्कीच प्रयत्न करतील, यात शंका नाही. त्यांच्यातील अल्लडपणा, निरागसतेतून एक प्रभावी व्यक्तिमत्त्व जन्माला येईल.
>
> **हेमंत पाटील, महाराष्ट्राची हास्यजत्रा फेम**

## महाराष्ट्र नायक राज्यस्तरीय पुरस्काराने सोपान महाजन सन्मानित

प्रतिनिधी । भडगाव

**सामाजिक आणि कला क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल भडगावचे सुपुत्र सोपान रमेश महाजन यांना या वर्षाचा प्रतिष्ठित महाराष्ट्र नायक राज्यस्तरीय पुरस्कार २०२६ देऊन गौरविण्यात आले.**



बी.एस.एफ.बहुउद्देशीय संस्था अमरावती आणि संत कबीर बहुउद्देशीय संस्था बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन केले होते. नाशिक येथील निलगिरी बागच्या धनलक्ष्मी गार्डन बँक्वेट हॉल येथे उत्साहात कार्यक्रम पार पडला. डॉ. अनिरुद्ध धर्माधिकारी यांच्या हस्ते सोपान महाजन यांना हा राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. या सोहळ्याला कार्तिक अर्जुन डांगे, डॉ. रावसाहेब घोडेराव, डॉ. गणेश व्यवहारे, वैशाली सोनवणे, विष्णू गायकवाड, स्मिता माटेकर, रितिका साळुंखे, लिलावती कापडणीस, सतीश शिंदे, अशोक नागरे उपस्थित होते.

# मुक्ताईनगर येथे एसटी बसचा वर्धापनदिन उत्साहात साजरा

## • लालपरीचा ७८ वा वर्धापनदिन प्रवाशांना पेढे वाटून कर्मचाऱ्यांनी केला साजरा

प्रतिनिधी । मुक्ताईनगर

**येथील बसस्थानकात राज्य परिवहन महामंडळाच्या बसचा अर्थात प्रवाशांच्या भाषेत महाराष्ट्राची जीवनवाहिनी असलेल्या लालपरीचा ७८ वा वर्धापन दिन प्रवाशांना पेढे वाटून उत्साहात साजरा झाला.**



प्रथमतः येथील बस डेपोमध्ये एसटी बसला विविध रंगीबेरंगी पताका लावून सजवण्यात आले. बसस्थानकात मोठे रंगीबेरंगी रांगोळी काढून त्यात सर्व प्रवाशांना ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा आणि प्रत्यक्ष आगार प्रमुख निलेश कलाल, अधिकारी राजू पाटील, गिरासे, गजरे यांचेसह वाहक कैलास वंजारी, त्यांच्या आनंदात सहभागी झाले. यावेळी प्रभाकर मोरे, चालक प्रमोद गोसावी, सुनील दामोदरे, सोपान विचवे आदी कर्मचाऱ्यांनी बसस्थानकात, पुढील प्रवासासाठी उपस्थित असलेल्या सर्व प्रवाशांना पेढे वाटप केले.

**मुक्ताईनगर येथील एसटी बसचा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. तसेच प्रवाशांना पेढे वाटण्यात आले.**

यावेळी आगार प्रमुख निलेश कलाल म्हणाले की प्रवाशांच्या सेवेची अखंड परंपरा आम्ही जपत असून जनतेच्या सेवेसाठी सदैव तत्पर आहे. पुढेही राहू. बहुतांशी प्रवाशांनी, पत्रकार व नागरिकांनी एसटीचे अधिकारी व सर्व कर्मचाऱ्यांना शुभेच्छा देऊन कृतज्ञता व्यक्त केली.

## नशिराबाद येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा स्वयंशोध फाउंडेशनतर्फे गुणगौरव

प्रतिनिधी । नशिराबाद

येथील स्वयंशोध फाउंडेशनतर्फे इयत्ता १० वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा भव्य गुणगौरव समारंभ नुकताच उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या सोहळ्यात नशिराबाद पंचक्रोशीतील ९० पेक्षा अधिक गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करून त्यांच्या शैक्षणिक यशाचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व्हिजन अकॅडमीचे संचालक अनिल माला होते. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या रावेर लोकसभा जिल्हाध्यक्षा तथा निंभोरा गावसेवा समितीच्या युवा संयोजिका भाग्यश्री ठाकरे तसेच ग्लोबल इंग्लिश मीडियम स्कूलच्या प्राचार्या वृषाली महाजन उपस्थित होत्या. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला प्रोत्साहन मिळावे आणि त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस प्रेरणा मिळावी, या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये नशिराबादसह मन्यारखेडा, कळगाव, जळगाव खुर्द, सुनसगाव आणि कडगाव या गावांतील इयत्ता १० वीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमास नशिराबादचे नगराध्यक्ष योगेश पाटील, उपनगराध्यक्ष पंकज महाजन, नगरसेवक चेतन बऱ्हाटे, शिवसह्याद्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष गणेश चव्हाण, मनसेचे जळगाव ग्रामीण जिल्हाध्यक्ष मुकुंद रोटे, मनोज नाले यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.

## थोडक्यात

### १५ लाखांसाठी विवाहितेचा छळ

**पारोळा ।** घर बांधण्यासाठी माहेरहून १५ लाख रुपये आणण्याची मागणी करत विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ केल्याप्रकरणी सासरकडील नऊ जणांविरुद्ध पारोळा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पीडित विवाहितेने दिलेल्या फिर्यादीनुसार, लग्नानंतर काही दिवस सासरकडून चांगली वागणूक मिळाली. मात्र त्यानंतर पती नितीन रवींद्र पाटील यांनी वेळोवेळी शिवीगाळ व मारहाण करून मानसिक आणि शारीरिक त्रास दिला. तसेच सासू उषा पाटील, सासरे रवींद्र पाटील, जेठ योगेश पाटील, जेठानी प्रतिक्षा पाटील, दिर अक्षय पाटील (सर्व रा. एरोली, नवी मुंबई), तसेच शांताराम अहिरे, चित्रा अहिरे (रा. कल्याण पूर्व, जि. ठाणे) आणि हर्षा पाटील (रा. मुंब्रा, जि. ठाणे) यांनीही घर बांधण्यासाठी माहेरहून १५ लाख रुपये आणण्याचा तगादा लावत शिवीगाळ, मारहाण व मानसिक छळ केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

## देवस्थान जमिनी वहिवाटदारांना हस्तांतरित करण्यास मंदिर महासंघाचा विरोध

प्रतिनिधी । अमळनेर

**महाराष्ट्र शासनाकडून देवस्थान इनाम व मंदिराच्या जमिनी वहिवाटदारांना हस्तांतरित करण्यासाठी आणल्या जाणाऱ्या प्रस्तावित कायद्याला महाराष्ट्र मंदिर महासंघाने तीव्र विरोध दर्शविला आहे. यासंदर्भात महासंघाच्या अमळनेर शाखेने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, स्थानिक खा. स्मिता वाघ, माजी मंत्री तथा आ. अनिल पाटील आणि उपविभागीय अधिकारी मयूर भंगाळे यांना निवेदन देऊन हा प्रस्ताव तातडीने मागे घेण्याची मागणी केली आहे.**



महासंघाच्या मते हा प्रस्तावित कायदा हिंदू देवस्थानांचे अस्तित्व संपवणारा असून तो भूमाफियांचे खिसे भरण्याचा डाव आहे. सर्वोच्च व उच्च न्यायालयाच्या निकालांनुसार देवस्थान जमिनी वहिवाटदारांना वाटण्याचा अधिकार कोणालाही नाही. हिंदू देवस्थान जमिनीच्या सातबारा उताऱ्यावर देवस्थान प्रतिबंधित सत्ता प्रकार अशी नोंद करण्याचे परिपत्रक काढावे, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. मंदिर महासंघाने काही महत्त्वपूर्ण सूचनाही केल्या आहेत. वक्फ बोर्डाच्या धर्तीवर देवस्थानांनाही संरक्षण मिळावे, गुजरातच्या धर्तीवर महाराष्ट्रातही अँटी लँड ग्रॅबिंग (जमीन बळकावण्याविरोधी) कायदा लागू करावा. देवस्थानची जमीन हडपणाऱ्यांना १४ वर्षे सश्रम कारावास आणि अजामीनपात्र शिक्षेची तरतूद करावी. गेल्या २५ वर्षांतील जमिनींच्या हस्तांतरणाची आणि बोगस नोंदींची चौकशी करण्यासाठी सनदी अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली विशेष तपास पथक स्थापन करावे. न्यायालयात प्रलंबित असलेली प्रकरणे निकाली काढण्यासाठी जलदगती न्यायालये स्थापन करून सहा महिन्यांत खटले मार्गी लावावेत. राज्यभर तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा महासंघाने दिला आहे. सदर निवेदनावर संतश्री प्रसाद महाराज, मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिंगबर महाले, सचिव सुरेश बाविस्कर, संजय पाटील आदींच्या सह्या आहेत.

## भरदिवसा घरफोडी; १५ लाखांचे दागिने लंपास

प्रतिनिधी । भुसावळ

**शहरातील भरदिवसा असलेले बंद घर पाहून चोरट्यांनी दोन तासात सुमारे १५ लाख रुपये किंमतीचे १० तोळे सोने लंपास केले. या घटनेने शहरात मोठी खळबळ उडाली आहे.**

याबाबत माहिती अशी की, शहरातील मिरची ग्राऊंड परिसरातील हुडको कॉलनी भागात महाराणा प्रताप विद्यालयाचे मुख्याध्यापक सुरेश शिंदे रहीवास करतात परिवार बाहेरगावी गेल्याने शिंदे हे घरी एकटेच होते. रविवार, ३१ मे रोजी दुपारी ते कटींग-दाढीसाठी बाहेर पडल्यानंतर गेट व मुख्य दरवाजाला कुलूप लावण्यात आले मात्र चोरट्यांनी वर्दळ नसलेल्या परिसरात संधी संधी साधुन चोरी केली आहे. दुपारी दीड वाजता मुख्याध्यापक घरी परतल्यावर घरफोडीचा प्रकार समोर आला. भरदिवसा झालेल्या घरफोडीच्या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी बाजारपेठ पोलीस स्टेशनमध्ये अज्ञात चोरट्याविरुद्ध नोंद करण्यात आली आहे. अधिक तपास हवालदार विजय नेरकर, चंद्रकांत रायपूरकर, दिलीप कोल्हे, जावेद शहा आदी करीत आहेत. दरम्यान पोलीसांनी घटनास्थळाची पाहणी केली तसेच सीसीटीव्ही फुटेजद्वारे तपास सुरू करण्यात आला आहे.

## स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत अनिल चौधरी यांची उमेदवारी

प्रतिनिधी । भुसावळ

**संस्था जळगाव स्थानिक स्वराज्य निवडणुकीसाठी भुसावळचे माजी नगराध्यक्ष अनिल चौधरी यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. यावेळी त्यांच्या सोबत शेकडो समर्थक उपस्थित होते.**

उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर प्रसार माध्यमांशी बोलतांना त्यांनी सांगितले की, माझ्या संपर्कात जिल्हाभरातून चारशेहून अधिक नगरसेवक असून मीच निवडून आल्यानंतर विधानपरिषदेत प्रभावीपणे नागरिकांचे प्रश्न मांडणार आहे. यावेळी यावलचे नगराध्यक्ष अतुल पाटील, नगरसेवक कुर्बान शेख, भुसावळचे नगरसेवक उल्हास पगारे, सचिन पाटील यांच्यासह विविध भागातील प्रतिनिधी उपस्थित होते. अनिल चौधरी यांनी गेल्या तीन महिन्यापासून जिल्हाभर फिरून आपली रणनिती तयार केली होती.

## अवजड वाहने, गाळाने भरलेल्या भरधाव डंपरमुळे मुक्ताईनगरात अपघाताची शक्यता

प्रतिनिधी । मुक्ताईनगर

शहराजवळील पूर्णा नदीतून गाळ वाहून नेण्यास महसूल खात्याने मोफत परवानगी दिलेली आहे. त्यामुळे पूर्णा नदीपात्रातून दिवसभर दर तासाला सुमारे आठ ते दहा डंपर गाळ घेऊन शहरातून भरधाव जातात. तसेच लांबलचक अवजड कंटेनर टँकर देखील भरधाव चालवले जातात. त्यामुळे चौकात व मुख्य रस्त्यावर अपघाताची दाट शक्यता आहे. पूर्णा नदीपात्रातील पाणीसाठा पुरेसा टिकविण्यासाठी, वाढण्यासाठी गाळ उपसणे अत्यावश्यक होते. एका परीने मोफत गाळ वाहून नेण्याची महसूल खात्याने परवानगी दिली ही एक चांगली बाब आहे. स

काळपासून तर संध्याकाळपर्यंत शहरातून प्रवर्तन चौक, भुसावळ रस्ता, बोदवड रस्ता आणि मलकापूर रस्त्याने दर तासाला सुमारे आठ ते दहा गाळाने भरलेले डंपर भरधाव वेगाने जात असतात. बऱ्याचदा वाहतुकीची कोंडी पण होते.

लांबलचक अवजड कंटेनर, मालवाहू ट्रक, टँकर व डंपरांच्या मागोमाग चार चाकी वाहने दुचाकी एसटी बस देखील अडकून पडतात. शहरात कुठेही वेग मर्यादेचा फलक नाही. ट्रॅफिक सिग्नल नाही.

वाहतूक नियम मार्गदर्शक फलक नाही. गेल्या दोन महिन्यात पुरणाड फाट्यावर डंपरच्या धडकेत दोन जण तर मागील महिन्यात शहराजवळील स्मशानभूमीच्या पुढे डंपरच्या धडकेत दोन युवक ठार झाल्याच्या घटना घडलेल्या आहेत. सूर्यास्तानंतर डंपरने गाळ वाहतूक बंद केली पाहिजे.

परंतु ती सर्रास सुरूच असते. मोफत गाळ मिळत असला तरी डंपर वाले मात्र डिझेल व मजुरीचा खर्च, अधिक त्यांचा नफा असे मिळून ती रक्कम वीट भट्टी वाल्यांना गाळ विक्री करून काढत असल्याचे सांगण्यात आले.

अधिकच्या जास्त फेऱ्या करण्यासाठी वेळ व वेग मर्यादेचे भान न ठेवता भरधाव डंपर शहरातून नेले जातात. त्यामुळे अपघात होण्याची दाट शक्यता आहे. प्रवर्तन चौकात व बोदवड रोड चौफुली चौकात कायमस्वरूपी ट्रॅफिक पोलीस नियुक्त करणे गरजेचे आहे. याकडे पोलीस अधिकाऱ्यांनी लक्ष द्यावे, अशी मागणी शहरवासीयांकडून होत आहे.

## • निधन वार्ता

### समाधान सपकाळे



**जळगाव ।** काळेनगर येथील रहिवासी समाधान राजू सपकाळे ( वय ३९) यांचे दु.२ वा. अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, एक भाऊ, पत्नी, दोन मुले असा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा दि. ३ जून रोजी सकाळी ९ वाजता राहत्या घरून निघणार आहे. ते महापालिकेचे कामगार अलकाबाई सपकाळे यांचा मोठा मुलगा व संदीप सापकाळे यांचे मोठे बंधू तर सुनिल सपकाळे, सुभाष सपकाळे यांचे पुतणे होत.

## भुसावळ भोरगाव लेवा पंचायत शाखेतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

प्रतिनिधी । भुसावळ

**भोरगाव लेवा पंचायत भुसावळ शाखेतर्फे दहावी व बारावी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केलेल्या लेवा समाजातील गुणवंत विद्यार्थी-विद्यार्थिनींचा भव्य सत्कार समारंभ रविवारी बी. व्ही. खाचणे सभागृहात मोठ्या उत्साहात पार पडला. या प्रेरणादायी कार्यक्रमास समाजातील शेकडो विद्यार्थी, पालक, आजी-आजोबा तसेच मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुटुंबनायक ललित पाटील होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून ह.भ.प. भरत महाराज बेळीकर उपस्थित होते. प्रारंभी सरस्वती देवी, लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल आणि स्वर्गीय रमेशदादा पाटील यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रास्ताविकात भुसावळ विभागाचे प्रमुख सुहास चौधरी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना सांगितले की, दहावी-बारावीत मिळालेले यश ही केवळ सुरुवात गुणगौरव कार्यक्रम आहे. भविष्यात आणखी मोठी उद्दिष्टे गाठण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरणा व प्रोत्साहन मिळावे, यासाठी हा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

## अमळनेर येथे दाऊदी बोहरा समाजातर्फे प्रवाशांसाठी शीतपेय वाटप

प्रतिनिधी । अमळनेर

**प्रवास करणाऱ्या नागरिकांचा उन्हाचा आणि प्रवासाचा त्रास कमी व्हावा, या उद्देशाने अमळनेर येथील दाऊदी बोहरा समाजातील युवा बद्री ग्रुप आणि मयदी ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने अमळनेर एसटी स्टँड परिसरात शीतपेय वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सकाळी १ ते दुपारी २ या वेळेत पार पडलेल्या या उपक्रमाचा लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत असंख्य प्रवाशांनी लाभ घेतला.**



कार्यक्रमाच्या प्रारंभी अमळनेर एसटी आगाराचे व्यवस्थापक श्री. प्रमोद बळीराम चौधरी यांचा दाऊदी बोहरा समाजाचे आमिल साहेब मुस्तफा भाई यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी १ जून रोजी असलेल्या एसटी महामंडळाच्या वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा देण्यात आल्या.या उपक्रमासाठी अमळनेर आगाराचे स्थानक प्रमुख अनिकेत वाल्मीक न्यायदे आणि वाहतूक निरीक्षक श्री. मुकेश ज्ञानेश्वर सैंदाणे हे विशेष उपस्थित होते. दाऊदी बोहरा समाजाचे प्रमुख शेख अली हुसेन भाई सैफी, शेख मोहम्मद भाई करमपुरवाला, शेख अब्बास भाई सैफी, मकसूद बोहरी आणि जाकीर क्रोकरीवाला. कार्यक्रमा यशस्वीतेसाठी बद्री ग्रुपमधील मुल्ला हुसेन भाई इझी, मुस्तफा कलकत्तावाला ,अली असगर बोहरी, श शब्बीर अकील व मयदी ग्रुपमधील होजेफा सैफी, ताहेर इझी, अब्दुलकादर आझाद, हकीमुद्दीन बोहरी, शब्बीर बुकवाला, उबे सैफी आदी कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. उन्हाच्या कडाक्यात प्रवाशांना दिलासा देणाऱ्या या सामाजिक उपक्रमाचे प्रवासी वर्गातून कौतुक होत आहे.

# शेतकी संघ निवडणुकीत बोगस मतदानाचा आरोप

## निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार; मयत ७०० ते ८०० सभासदांच्या नावावर मतदानाचा संशय

प्रतिनिधी । अमळनेर

**अमळनेर तालुका शेतकरी सहकारी संघ लिमिटेडच्या संचालक मंडळाच्या (२०२५-२०३०) पंचवार्षिक निवडणुकीत मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार झाल्याचा आरोप करत काही उमेदवारांनी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. चौकशी पूर्ण होईपर्यंत निकाल जाहीर करू नये, अशी मागणी त्यांनी केली आहे.**



उमेदवार गिरीश सोनजी पाटील, सौ. कल्याणी दिनेश साळुंखे आणि किरणगिर भरतगिर गोसावी यांनी दिलेल्या अर्जात सुमारे ५ हजार मयत सभासदांपैकी ७०० ते ८०० सभासदांच्या नावावर बोगस मतदान झाल्याची गंभीर शंका व्यक्त केली आहे. त्यामुळे मतदान प्रक्रियेची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

तसेच प्रत्येक मतदान केंद्रावरील मतदान केलेल्या मतदारांची यादी व मतदान नोंदींच्या प्रमाणित प्रती उपलब्ध करून देण्याची मागणी अर्जात करण्यात आली आहे. चौकशी पूर्ण होईपर्यंत कोणालाही विजयी घोषित करू नये किंवा निवड प्रमाणपत्र देऊ नये, असेही अर्जदारांनी म्हटले आहे. चौकशीपूर्वी निकाल जाहीर झाल्यास न्यायालयीन आणि अन्य कायदेशीर मार्गांचा अवलंब केला जाईल, असा इशाराही अर्जात देण्यात आला आहे. या तक्रारीमुळे शेतकी संघाच्या निवडणूक प्रक्रियेबाबत नव्या चर्चांना उधाण आले असून प्रशासनाच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**• शेतकी संघाच्या निवडणुकीत अनिल पाटील पुरस्कृत राष्ट्रवादी काँग्रेसने प्रथमच १५ पैकी १० जागा जिंकून घवघवीत यश संपादन केले. परंतु येथे मृत सभासदांच्या नावावर बोगस मतदान झाल्याचा आरोप झाल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.**

## भुसावळ विभागात ६६ रेल्वे कर्मचाऱ्यांचा सेवानिवृत्ती समारंभ उत्साहात

प्रतिनिधी । भुसावळ

**भुसावळ रेल्वे विभागात कृष्णचंद्र सभागृह येथे सेवानिवृत्त रेल्वे कर्मचाऱ्यांच्या सन्मानार्थ भव्य सेवानिवृत्ती समारंभाचे आयोजन करण्यात आले. हा समारंभ अत्यंत गरिमामय आणि भावनिक वातावरणात पार पडला.**

यावेळी मोठ्या संख्येने रेल्वे कर्मचारी तसेच त्यांच्या कुटुंबीयांनी उपस्थिती दर्शविली. सभागृह पूर्णतः भरलेले होते. प्रसंगी एकूण ६६ रेल्वे कर्मचारी सेवानिवृत्त झाले. त्यापैकी ५७ कर्मचारी जुन्या पेन्शन योजनेशी तर ९ कर्मचारी नव्या पेन्शन योजनेशी संबंधित होते. याशिवाय, रेल्वे सेवेत उत्कृष्ट कार्य तसेच अपघातमुक्त आणि सुरक्षित सेवा बजावल्याबद्दल ७ कर्मचाऱ्यांना अपघातमुक्त व सुरक्षित सेवेसाठी पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय रेल्वे व्यवस्थापक पुनीत अग्रवाल होते. यावेळी अपर विभागीय रेल्वे व्यवस्थापक (तांत्रिक) मुकेश कुमार मीणा, कार्मिक अधिकारी दिलीप खरात, सहाय्यक कार्मिक अधिकारी सुरेंद्र हिवाले सेवानिवृत्ती समारोह तसेच इतर अधिकारी उपस्थित होते.